MHAU160039212025

दाखल तारीख:- १८.०६.२०२५
नोंदणी तारीख:- १८.०६.२०२५
निकाल तारीख:- २२.०४.२०२६
कालावधी:- **००** वर्षे, १**०** महिने **०४** दिवस

**गंगापूर येथील जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरीक्त सत्र न्यायाधीश, गंगापूर, जि. छत्रपती-संभाजीनगर**
(पिठासीन अधिकारी शा. भा. बहाळकर)

**दिवाणी किरकोळ अर्ज क्रमाक. ७१/२०२५** **निशाणी क्रमांक २३**

**सुनिता संतोष पाटेकर**
**आता - सुनिता भगवान पठाडे**
वय:- ३४ वर्षे, व्यवसाय:- शेती,
रा. लिबेंजळगांव, ता. गंगापूर,
जि. छत्रपती-संभाजीनगर ..... **अर्जदार**

**विरुध्द**

१. **निर्मला उध्दव निकम,**
वय:- ४१ वर्षे, व्यवसाय:- घरकाम,

२. **अंकुश वसंतराव पाटेकर,**
वय:- ३६ वर्ष, व्यवसाय:- शेती,

३. **चंद्रभागाबाई वसंतराव पाटेकर**
वय:- ७१ वर्ष, व्यवसाय:- निरंक,
सर्व रा. तुर्काबाद- खराडी,
ता. गंगापूर, जि. छत्रपती-संभाजीनगर ..... **गैरअर्जदर**

.................................................................................................

| | | |
|---|---|---|
| अर्जदारतर्फे | - | विधीज्ञ श्री. ए. एस. शेख |
| गैरअर्जदारांतर्फे | - | विधीज्ञ श्री. एस. एस. कसाने |

.................................................................................................

**न्यायनिर्णय**
**(पारित दिनांक:- २२ एप्रिल, २०२६)**

अज्ञान मुलगी - कार्तिकी आणि अज्ञान मुलगा - रुद्र यांचा ताबा मिळण्याकरीता अर्जदार हिने पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० चे कलम ७, ८, ९ व १२ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार हिचे कथन असे आहे की, ती स्वत: व गैरअर्जदार हे हिंदु धर्मीय आहेत. गैरअर्जदार क्रमांक १ व २ यांचा भाऊ व गैरअर्जदार क्रमांक ३ हिचा मुलगा नामे - संतोष वसंतराव पाटेकर याच्याशी तिचा विवाह दिनांक ११.०४.२००८ रोजी हिंदु धर्म रितीरिवाजाप्रमाणे झाला होता. सदर लग्नसबंधातून अर्जदार हिला दिनांक २४.११.२०१२ रोजी एक मुलगी नामे - कार्तिकी व दि.२३.०३.२०१६ रोजी एक मुलगा नामे - रुद्र असे दोन अपत्य झालेले आहेत. कार्तिकी ही सध्या १२ वर्ष वयाची आहे व रुद्र हा सुमारे ८ वर्ष वयाचा आहे. ते दोघे शिक्षण घेत आहेत.

**०३.** अर्जदार हिचे पुढे कथन असे आहे की, तिचे पती नामे - संतोष पाटेकर हे दिनांक ०७.१२.२०२० रोजी मुत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू पावले. तिचा मुलगा नामे - रुद्र हा जन्मत:च मतिमंद आहे. अर्जदार हिचे पती जिवंत असेपर्यंत ते त्यांच्या मुलांचा सांभाळ करीत होते. मात्र ते आजारी असतांना या मुलांचा सांभाळ अर्जदार हिने स्वत: केलेला आहे व ती तिच्या मुलांचा सांभाळ चांगल्या प्रकारे करु शकते.

**०४.** अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, तिचे पहिले पती नामे- संतोष पाटेकर हे मयत झाल्यानंतर तिला अन्य कोणाचाही आधार नसल्याने तिने स्वत:चा आणि तिच्या अपत्यांचा भविष्याचा विचार करुन दिनांक ०७.०२.२०२५ रोजी इसम नामे - भगवान पठाडे याच्याशी दुसरा विवाह केलेला आहे. त्यांना स्वत:चा व्यवसाय आणि शेती आहे.

**०५.** अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हिने भगवान पठाडे यांचेसोबत विवाह केल्यानंतर ती तिच्या अपत्यांसह भगवान पठाडे यांचे घरी मौजे ढोरेगांव, ता. गंगापूर येथे संसार करुन राहू लागली आहे.

मात्र, माहे - फेब्रुवारी, २०२५ च्या दुस-या आठवडयात गैरअर्जदार क्रमांक १ ते ३ यांनी एकमेकांशी संगनमत करुन अर्जदाराच्या दोन्ही अपत्यांना मौजे लिंबेजळगांव येथे नेले आहे व बळजबरीने स्वत:च्या ताब्यात ठेवलेले आहे. अर्जदार हिने गैरअर्जदारांकडे तिच्या अपत्यांची अनेकवेळा मागणी केली, मात्र अपत्ये तिच्या ताब्यात देण्यास गैरअर्जदारांनी नकार दिला. तसेच, गैरअर्जदार हे तिच्या दोन्ही अपत्यांना शाळेत पाठवत नाही व वेळोवेळी औषधोपचारही करत नाही. गैरअर्जदार क्रमांक ३ ही ७० वर्षांपेक्षा जास्त वयाची असून ती काठीच्या आधारे चालते. त्यामुळे, ती अर्जदाराच्या दोन्ही अज्ञान मुलांचा सांभाळ करण्यास सक्षम नाही. गैरअर्जदार क्रमांक ३ हिला तिच्या स्वत:चा मुलगा म्हणजे गैरअर्जदार क्रमांक २ हा सांभाळत नाही, त्यामुळे तो अर्जदाराच्या दोन्ही अपत्यांचा सांभाळ करु शकणार नाही.

**०६.** अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदाराचे अपत्ये ताब्यात परत देण्यास नकार दिला म्हणून तिने दिनांक २४.०३.२०२५ रोजी वकिलांमार्फत नोटिस पाठवून तिचे अपत्ये परत देण्याची मागणी केली. मात्र, नोटिस मिळवूनही गैरअर्जदारांनी नोटिसीचे उत्तर दिले नाही किंवा अर्जदाराचे अपत्ये देखील परत तिच्या ताब्यात दिलेले नाहीत.

**०७.** अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, मौजे तुर्काबाद-खराडी येथे अर्जदार व तिच्या दोन अपत्यांच्या सामायिकरित्या गट क्रमांक १८४ क्षेत्र १ हे २७ आर ही शेतजमीन आहे आणि अर्जदार ही अ.पा.क. म्हणून नमूद आहे. सदर शेतीमध्ये ती मालक व ताबेदार म्हणून काम करते. तिच्या शेतातील गहू गैरअर्जदार क्रमांक १ व २ यांनी चोरुन नेल्याबद्दल तिने पोलिसांत तक्रार दाखल केलेली आहे.

०८. उपरोक्त परिस्थितीत गैरअर्जदारांनी अर्जदाराचे दोन्ही अपत्ये ताब्यात देण्यास नकार दिला. त्यामुळे, सरतेशेवटी तिने हा अर्ज दाखल केलेला आहे व शेवटी विनंती केली आहे की, तिची मुलगी नामे - कार्तिकी व मुलगा नामे - रुद्र यांना गैरअर्जदारांच्या ताब्यातून तिच्या ताब्यात देण्याचा आदेश न्यायालयाने करावा.

०९. गैरअर्जदार क्रमांक १ ते ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे (निशाणी ८) दाखल केले आहे. अर्जदार हिने अर्जात केलेले आरोप त्यांनी नाकारलेले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, अज्ञान मुलगी - कार्तिकी व अज्ञान मुलगा - रुद्र यांचे वडील म्हणजे संतोष पाटेकर हे आजारी असतांना आजारपणात त्यांची देखभाल त्यांच्या कुटूबांने केली व औषधोपचाराचा खर्चही त्यांनी केला. मात्र, अर्जदार हिने वैद्यकीय खर्चापोटी मिळालेले पैसे स्वत:कडे ठेवून घेतले.

१०. गैरअर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, कार्तिकी ही तुर्काबाद येथील शाळेत इयत्ता ८ वीत शिकत आहे व ती गैरअर्जदारांसोबत मोठया कुटूंबात एकत्रपणे राहत आहे. त्यामुळे, तिचा सांभाळ करण्यास ते सर्व सक्षम आहेत. तसेच, अर्जदार हिचा मुलगा नामे - रुद्र हा औरंगाबाद येथील इंदिरा निवासी मतिमंद विद्यालयात राहून शिक्षण घेत आहे व त्याचा सर्व खर्च अर्जदार क्रमांक १ ते ३ हे करीत आहेत. रुद्र हा सणावाराला त्यांचे घरी येत असतो. त्याचे संगोपन निटपणे सुरु आहे व त्याचे मानसिक आरोग्य सुधारत आहे.

११. गैरअर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार हिने स्वत:च्या सुखासाठी ढोरेगांव येथील भगवान पठाडे याच्याशी विवाह

केलेला आहे. त्याला त्याची पहिली पत्नी हिचेपासून दोन मुले आहेत. त्याच्या पत्नीचा मृत्यू संशयास्पद स्थितीत झालेला आहे. भगवान पठाडे याचा दुसरा विवाह शरणापूर येथील सविता हिवर्डे हिच्याशी झाला होता. मात्र, भगवान पठाडे व त्याचे आईने सविता हिचा शारीरिक मानसिक छळ करुन घरातून काढून दिलेले आहे. भगवान पठाडे याला दारुचे व इतर घाणेरडी व्यसने आहेत. अशा पस्थितीत अज्ञान बालके म्हणजेच कार्तिकी व रुद्र यांना अर्जदार हिच्यासोबत ढोरेगांव येथे पाठविल्यास त्यांच्या मानसिक आरोग्यावर दुष्परिणाम होईल. तसेच, भगवान पठाडे याच्या पहिल्यापासून झालेल्या मुलांबाबत द्वेषभावना वाढू शकते.

१२. गैरअर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, अज्ञान बालके म्हणजे कार्तिकी आणि रुद्र यांच्या नांवावर सामायिकरित्या असलेली शेतमिळकत भगवान पठाडे याला मिळवायची आहे, त्यामुळे त्याने अर्जदार हिला उभे करुन हा अर्ज दाखल करण्यास भाग पाडले आहे. सबब, वर उल्लेख केलेल्या कारणांच्या आधारे अर्जदार हिचा अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती गैरअर्जदारांनी केलेली आहे.

१३. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थिती झाले. त्यावर मी खालील दिलेल्या कारणांकरीता माझे निष्कर्ष नोंदविलेले आहे:-

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अज्ञान मुलगी - कार्तिकी व अज्ञान मुलगा - रुद्र यांचा ताबा अर्जदार हिचेकडे देणे न्यायोचित होईल काय ? | .... | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | .... | अर्ज नामंजूर (Rejected) करण्यात येत आहे. |

## कारणमिंमासा

**मुद्दा क्रमांक १ करीता:-**

**१४.** पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० चे कलम ७ प्रमाणे जेव्हा न्यायालयाची खात्री पटते की अल्पवयीन व्यक्तीच्या हितासाठी त्या व्यक्तीचा किंवा मालमत्तेचा किंवा दोन्हींचा संरक्षक नेमणे किंवा एखाद्या व्यक्तीला पालक म्हणून घोषित करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत न्यायालय त्यानुसार आदेश देऊ शकते.

१५. पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० चे कलम १७ पालकाची नियुक्ती करताना न्यायालयाने विचारात घ्यावयाच्या बाबीबाबत तरतुदी सांगते, त्या खालीलप्रमाणे:-

(१) अल्पवयीन व्यक्तीच्या पालकाची नियुक्ती किंवा घोषणा करताना, न्यायालय, या कलमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, अल्पवयीन व्यक्ती ज्या कायद्याच्या अधीन आहे त्याच्याशी सुसंगतपणे, परिस्थितीनुसार जे अल्पवयीन व्यक्तीच्या कल्याणासाठी योग्य वाटेल त्याचे मार्गदर्शन घेईल.

(२) अल्पवयीन मुलाच्या कल्याणासाठी काय योग्य ठरेल याचा विचार करताना, न्यायालयाने अल्पवयीन मुलाचे वय, लिंग आणि धर्म, प्रस्तावित पालकाचे चारित्र्य आणि क्षमता, तसेच अल्पवयीन मुलाशी त्याचे असलेले जवळचे नातेसंबंध, मृत पालकाची काही इच्छा असल्यास ती, आणि प्रस्तावित पालकाचे अल्पवयीन मुलाशी किंवा त्याच्या मालमत्तेशी असलेले कोणतेही विद्यमान किंवा पूर्वीचे संबंध विचारात घ्यावेत.

(३) जर अल्पवयीन व्यक्ती स्वतःची पसंती जाणीवपूर्वक ठरवण्याइतकी मोठी असेल, तर न्यायालय त्या पसंतीचा विचार करू शकते.

*[उप-कलम (4) हे अधिनियम 3, 1951, कलम 3 आणि अनुसूचीद्वारे वगळण्यात आले.]*

(५) न्यायालय कोणत्याही व्यक्तीला त्याच्या इच्छेविरुद्ध पालक म्हणून नियुक्त करणार नाही किंवा घोषित करणार नाही.

**१६.** अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ अर्जदार हिने तिचे शपथपत्र (निशणी १२) दाखल केलेले आहे. त्यात तिने अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. थोडक्यात तिचे म्हणणे आहे की, ती अज्ञान मुलगी - कार्तिकी आणि अज्ञान मुलगा - रुद्र यांची जन्मदाती व नैसर्गिक पालक आहे. तिच्या पतीच्या निधनानंतर तिने तिच्या दोन्ही अपत्यांच्या भविष्यासाठी भगवान पठाडे याचेसोबत विवाह केलेला आहे. त्यानंतर, ती दोन्ही अपत्यांसह ढोरेगांव येथे भगवान पठाडे याच्यासोबत संसार करुन मौजे तुर्काबाद - खराडी येथील गट क्र.१८४ ही जमीन ये-जा करुन कसत आहे. सदर जमीन ही तिच्या उत्पन्नांचे मुख्य साधन आहे. मात्र फेब्रुवारी, २०२५ च्या दुस-या आठवडयात गैरअर्जदार यांनी तिच्या दोन्ही अपत्यांना लिंबेजळगांव येथे नेले आहे व तेंव्हा पासून त्यांना बळजबरीने स्वत:च्या ताब्यात ठेवले आहे.

**१७.** अर्जदार हिने तिचे शपथपत्रात असेही कथन केले आहे की, गैरअर्जदार हे तिच्या अपत्यांचा निटपणे सांभाळ करत नाही व काळजी घेत नाही. सबब, दोन्ही अपत्यांवर आई या नात्याने नैसर्गिक प्रेम आणि गरज म्हणून तिला त्यांच्या ताब्याची आवश्यकता आहे. ती दोन्ही अपत्यांचा निटपणे सांभाळ,शिक्षण व देखभाल करु शकते. सबब, दोन्ही अपत्ये ताब्यात मिळावी अशी विनंती तिने केलेली आहे.

**१८.** अर्जदार हिने स्वत:च्या म्हणण्याला बळकटी मिळावी या हेतूने तिचे वडील कैलास आसाराम पडघन व तिचा दुसरा पती- भगवान रावसाहेब

पठाडे या दोघांची शपथपत्रे (निशाणी १३ व १४) दाखल केलेली आहेत. त्यात त्यांचे म्हणणे आहे की, अर्जदार हिच्या दोन अपत्यांचा सांभाळ करण्यास ते तयार आहेत व त्यांची त्यासाठी संमती आहे. तसेच, ते अर्जदार हिला सर्व सहकार्य करण्यास तयार आहेत.

१९. याउलट, गैरअर्जदार यांचे तर्फे अज्ञान मुलांचा चुलता नामे - अंकुश वसंतराव पाटेकर, चुलत आजोबा - बालचंद पाटीबा पाटेकर व गैरअर्जदार क्रमांक १ - निर्मला निकम यांनी त्यांची शपथपत्रे (अनुक्रमे निशाणी क्रमांक १६, १७ व १८) दाखल केलेली आहेत. थोडक्यात त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार हिने कोणालाही न कळविता भगवान पठाडे यांच्याशी विवाह केला आहे व ती स्वत:हून तिच्या दोन्ही मुलांना सोडून पतीच्या घरी ढोरेगांव येथे निघून गेलेली आहे व तिने स्वत:हून तिच्या अपत्यांचा सांभाळ करण्यास नकार दिलेला आहे. मात्र तुर्काबाद-खराडी येथील शेतजमीन तिचे आणि तिच्या अपत्यांच्या सामायिक नावावर असल्यामुळे ती जमीन आपल्याला मिळावी या हेतूने तिचा दुसरा पती - भगवान पठाडे याने अर्जदार हिला पुढे करुन हा खोटा अर्ज दाखल केलेला आहे.

२०. उपरोक्त तिघांचे शपथपत्रात असे म्हणणे आहे की, मौजे तुर्काबाद-खराडी येथे त्यांचे मोठे एकत्र कुटूंब आहे. त्यात अर्जदाराच्या अपत्यांचा सांभाळ करण्यास गैरअर्जदार व इतर नातेवाईक आहेत. त्यामुळे, त्यांची देखभाल सहजपणे करता येणे शक्य आहे. तसेच, त्यांचे म्हणणे आहे की, गैरअर्जदार यांना पुरेशे आर्थिक उत्पन्न आहे ज्यातून ते अर्जदाराच्या दोन्ही अपत्यांचा निटपणे सांभाळ करण्यास सक्षम आहेत. अज्ञान मुलगी कार्तिकी ही लिंबे-जळगांव येथे शिक्षण घेत आहे व ती

नियमीतपणे शाळेत जात असते. याशिवाय, अज्ञान मुलगा- रुद्र याला मतिमंद मुलांसाठी असलेल्या वस्तीगृहात ठेवलेले आहे व त्यासाठी आवश्यक असलेला खर्च गैरअर्जदार हे करतात. तसेच, सदर मुलगा - रुद्र हा सणावाराला त्यांचे घरी येत असल्यामुळे त्याचीही निटपणे देखभाल केली जात आहे.

२१. उपरोक्त तिघांनी त्यांचे शपथपत्रात असेही नमुद केले आहे की, अर्जदार हिचा दुसरा पती - भगवान पठाडे याला दारु पिण्याचे वाईट व्यसन आहे. तसेच, इतरही वाईट व्यसने त्याला आहेत. याशिवाय, भगवान पठाडे याला त्याच्या मयत पत्नीपासून दोन आपत्ये आहेत, जे त्याच्यासोबत राहतात. अशा परिस्थितीत अर्जदार ही तिच्या अपत्यांचा निटपणे सांभाळ करु शकणार नाही व भगवान पठाडे याच्या मुलांविषयी या बालकांच्या मनात द्वेष भावना उत्पन्न होऊ शकते. उपरोक्त कारणांच्या आधारे अर्जदार हिचा अर्ज रद्द व्हावा अशी मागणी गैरअर्जदार यांनी केलेली आहे.

२२. अज्ञान बालकांचा ताबा ठरवितांना ज्या व्यक्तीकडे त्यांचा ताबा द्यायचा आहे, त्या व्यक्तीकडे त्या बालकांच्या पालन-पोषणासाठी पुरेसे आर्थिक बळ आहे किंवा नाही हे पाहणे अत्यंत महत्वाचे असते. या प्रकरणात अर्जदार हिचे कथन असे आहे की, तुर्काबाद खराडी येथील गट क्रमांक १८४ ही जमीन ती स्वत: ये-जा करुन मशागत करते व त्यातून उत्पन्न मिळविते. मात्र, ती जमीन ती स्वत: कसते व त्यातून किती उत्पन्न मिळविते, याबद्दल कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदार हिने दिलेला नाही. याउलट, असे दिसून येते की, भगवान पठाडे याच्याशी लग्न झाल्यानंतर अर्जदार ही त्याचेवर अवलंबून जगत आहे.

२३. भगवान पठाडे यांनी त्यांचे शपथपत्रात म्हटलेले आहे की, अर्जदार हिने तिच्या अपत्यांचे पालन-पोषण करण्यास त्याची संमती आहे व आवश्यक ते सहकार्य करण्यास तो तयार आहे. या ठिकाणी, असे नमूद करणे गरजेचे आहे की, या प्रकरणातील दोन बालके ज्यांच्या ताब्याविषयी वाद सुरु आहे, ते भगवान पठाडे याचे औरस, अनौरस किंवा दत्तक अपत्य नाहीत, त्यामुळे भविष्यात जर भगवान पठाडे यांनी या मुलांचा सांभाळ करण्यास नकार दिला तर, ती मुले भगवान पठाडे याचे विरुध्द त्यांच्या पोटगीसाठी किंवा सांभाळ करण्यासाठी कोणतीही कायदेशीर दाद मागू शकणार नाही किंवा भगवान पठाडे याचेवर त्या मुलांचा सांभाळ करण्याची कोणतीही जबाबदारी कायदेशीररित्या लादता येणार नाही. त्यामुळे, उपरोक्त परिस्थितीत अर्जदार हिच्याकडे तिच्या अपत्यांचा सांभाळ करण्यासाठी पुरेसे आर्थिक बळ आहे असे म्हणता येणार नाही.

२४. अर्जदार हिने म्हटलेले आहे की, तिने दिनांक ०७.०२.२०२५ रोजी भगवान पठाडे याच्याशी दुसरा विवाह केलेला आहे. अशा परिस्थितीत तिचे म्हणणे आहे की, लग्नानंतर ती तिच्या दोन अपत्यांसह भगवान पठाडे यांच्या घरी ढोरेगांव येथे राहण्यासाठी गेली होती. त्या अगोदर, ती मुले लिंबेजळगांव येथील शाळेत शिकत होती. तर, अशा परिस्थितीत प्रश्न उद्भवतो तो असा की, फेब्रुवारी महिन्यात मुलांच्या शाळा सुरु असतात तर तिने तिच्या मुलांना शाळा सोडून तिच्यासोबत ढोरेगांव येथे का नेले. तिने मुलांच्या शिक्षणासाठी त्या काळात काळजी का घेतली नाही. या परिस्थितीत दोन निष्कर्ष काढता येतात. ते म्हणजे असे की, एकतर अर्जदार ही तिच्या दोन्ही अज्ञान मुलांना सोडून नव्या पतीच्या घरी एकटी निघून गेली होती किंवा मुलांच्या शाळेची पर्वा न करता तिने त्यांना ढोरेगांव

येथे नेले होते. या बाबी हे दाखविण्यास पुरेशा आहेत की, अर्जदार ही तिच्या मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत गंभीर नाही.

२५. याबाबतीत दोन्ही पक्षांमध्ये वाद नाही की, अर्जदार हिचा अज्ञान मुलगा - रुद्र हा मतिमंद आहे व त्याला मतिमंदासाठी असलेलया विशेष शाळेत/वस्तीगृहात ठेवण्यात आलेले आहे. अशा परिस्थितीत रुद्र याच्या पालन-पोषणाचा खर्च हाच मुद्दा महत्वाचा ठरतो. यापुर्वीच उल्लेख केला आहे की, अर्जदार हिला स्वत:चे उत्पन्न नाही व ती स्वत:च तिचा दुसरा पती - भगवान पठाडे याच्यावर अवलंबून आहे. तसेच, अज्ञान बालक - रुद्र याला भविष्यात भगवान पठाडे याचेविरुध्द पोटगी किंवा आर्थिक मदत मागण्याचा कायदेशीर हक्क नाही.

२६. अज्ञान मुलगी - कार्तिकी हिचे वय सध्या सुमारे १४ वर्षे इतके आहेत. सामान्यपणे मुलगी जेंव्हा वयात येत असते तेव्हा तिची योग्यपणे देखभाल करण्यासाठी तिची आई ही योग्य पालक असते. मात्र, या प्रकरणात गैरअर्जदार क्रमांक ३ ही स्त्री आहे व ती कार्तिकी हिची आजी आहे. म्हणजे, कार्तिकी हिची काळजी घेण्यासाठी स्त्री म्हणून गैरअर्जदार क्रमांक ३ ही उपलब्ध आहे.

२७. पालक आणि पाल्य अधिनियम, १८९० चे कलम १७ चे उपकलम ३ प्रमाणे जर अल्पवयीन व्यक्ती स्वतःची पसंती जाणीवपुर्वक ठरविण्याइतकी मोठी असेल, तर न्यायालय त्या पसंतीचा विचार करू शकते. अर्जदार हिची मुलगी - कार्तिकी हिचे वय सध्या १४ वर्षे इतके आहेत. ती इयत्ता ८ वीत शिकत आहे. त्यामुळे, ती स्वत:ची पसंती जाणीवपुर्वक ठरविण्याइतकी मोठी आहे. सबब, उपरोक्त तरतुदींचा आधार घेत बंदिस्त

न्यायदान कक्षात (अर्जदार किंवा गैरअर्जदार तसेच, त्यांचे वकीलांचे गैरहजेरीत व अन्य कोणीही व्यक्ती म्हणजे या न्यायालयाच्या दोन कर्मचा-यांव्यतिरीक्त कोणीही हजर नसतांना) अज्ञान मुलगी - कार्तिकी हिच्याकडे तिच्या पसंतीबाबत विचारपुस केली असता, तिने सांगितले की, ती सध्या तुर्काबाद-खराडी येथे आजीसोबत म्हणजे गैरअर्जदार क्रमांक ३ सोबत राहत आहे व लिंबेजळगांव येथे रोज नियमीतपणे शाळेत येऊन शिक्षण घेत आहे. तिची आजी तिची निटपणे देखभाल करते. तसेच, तिची आई म्हणजे अर्जदार ही तिला (कार्तिकी) व तिचा भाऊ (रुद्र) यांना तुर्काबाद-खराडी येथे सोडून निघून गेली व तिने दुस-या माणसासोबत लग्न केलेले आहे व त्या माणसाला दारु पिण्याचे व्यसन आहे. अशा परीरिस्थितीत तिला अर्जदार हिच्यासोबत जायचे नाही व राहायचे नाही.

२८. सबब, उपरोक्त परिस्थितीत असे दिसून येते की, अर्जदार हिला स्वत:चे उत्पन्नांचे साधन नाही. तिने तिची मुलगी - कार्तिकी हिच्या शिक्षणाची व पालन-पोषणाची जबाबदारी निटपणे सांभाळलेली नाही. याउलट, अज्ञान मुलगी - कार्तिकी ही तिची आजी म्हणजे गैरअर्जदार क्रमांक ३ तिच्यासोबत राहते आहे व गैरअर्जदार आणि इतर कुटूंबिय कार्तिकी हिच्या शिक्षणाची व पालन-पोषणाची जबाबदारी निटपणे पार पाडीत आहे.

२९. अशा परिस्थितीत गैरअर्जदार किंवा कार्तिकी हिच्या मयत वडीलांचे इतर नातेवाईक ज्यांचेवर कार्तिकी किंवा रुद्र हे दोघे अवलंबून आहेत, त्यांनी जर त्यांचा निटपणे सांभाळ केला नाही तर, त्यासाठी पोटगी किंवा आर्थिक मदत मागण्याची कायदेशीर तरतुद हिंदु दत्तक व निर्वाह अधिनियम,१९५६ चे कलम २१ व २२ प्रमाणे आहे.

**३०.** उपरोक्त कारणांच्या आधारे मी या निष्कर्षास आलेलो आहे की, अज्ञान मुलगी कार्तिकी व अज्ञान मुलगा - रुद्र यांच्या ताबा अर्जदार हिला देणे न्यायोचित होणार नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नाकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता:-</u>**

**३१.** वर उल्लेख केल्याप्रमाणे अज्ञान मुलांचा ताबा अर्जदार हिच्याकडे देणे न्यायोचित होणार नाही. अशा परिस्थितीत हा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज नामंजूर (Rejected) करण्यात आला आहे.

**२.** खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHYAMKANT BHALCHANDRA BAHALKAR
Date: 2026.04.22 17:16:21 +0530

**(शा. भा. बहाळकर)**
जिल्हा न्यायाधीश– १ व
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, गंगापूर,
जि. छत्रपती–संभाजीनगर

दिनांक:- २२.०४.२०२६